महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७३५६, ४६५, ४९२, ४४२

ई-मेल - desk२@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२६/५४३ दिनांक : 15 JUL 2026

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र / फार्म डी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम व अभिकल्प इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत....

संदर्भ : १) संचालनालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२६/५०४, दि.०८ जुलै, २०२६
२) संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२६/५०५, दि.०८ जुलै, २०२६

विषयांकीत संदर्भीन परिपत्रक तथा पत्र पहावित.

संदर्भीय क्र. १ च्या परिपत्रकान्वये थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने जाहीर केलेल्या दिनांकाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी दिनांक २०.०७.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यी संस्था बदलासाठीच्या मुतदवाढीस अनुसरून विषयांकीत प्रकरणी संस्था व आपले स्तरावरुन कार्यवाही करण्यासाठीची कालमर्यादा सोबतच्या प्रपत्र अ मध्ये नमूद केल्यानुसार निश्चित केली आहे. तरी, प्रस्तूत प्रकरणी सोबतच्या "प्रपत्र अ" मध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेत कार्यवाही करण्यात यावी. सदर कार्यवाही करतांना विभागीय कार्यालय स्तरावरुन व संबंधित संस्थांचे प्राचार्य यांनी नियमांचे काटेकार पालन करावे.

(डॉ.प्रमोद नाईक)
प्र.संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, माहितीसाठी सादर

१) मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर
२) मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)
३) प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी इ. पदवी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य (संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे मार्फत)
४) कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई
५) कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७३५६, ४६५, ४९२, ४४२
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२६/५४२ दिनांक : 15 JUL 2026

परिपत्रक

विषय : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र / फार्म डी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम व अभिकल्प इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत....

संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२६/५०४, दि.०८ जुलै, २०२६

उपरोक्त विषयाच्या संदर्भीन परिपत्रकान्वये संस्था व पाठ्यक्रम बदलासाठी दि.१५.०७.२०२६ पर्यंत अर्ज करण्याची कालमर्यादा निश्चित करण्यात आली होती. दरम्यान थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमासाठी नोंदणी, गुणवत्ता याद्या प्रसिध्द करणे इ. साठी जाहीर केलेल्या दिनांकाच्या अनुषंगाने विषयांकीत प्रकरणी अर्ज करण्यासाठी दि.२०.०७.२०२६ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

(डॉ.प्रमोद नाईक)
प्र.संचालक, तंत्र शिक्षण,म. रा. मुंबई

प्रत : मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थाना अग्रेषित करून संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करण्यास कळविण्यात यावे.
२. प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी पदवी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य. त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करून पुढील उचित कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी.
३. मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)
४. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई
५. कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.

# <u>प्रपत्र अ</u>

| अ. क्र. | तपशील | कार्यवाही | कालमर्यादा | कार्यवाही प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | अ) संस्था अंतर्गत शाखा बदल | संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तनेसार शाखा बदलाची कार्यवाही करावी | दि.२०/७/२०२६ पर्यंत किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या **३ दिवस अगोदर** यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | प्राचार्य, संबंधित संस्था यांचे स्तरावरून सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांचे मान्यतेने |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल | प्राप्त विनंती अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारे विहित नमुन्यातील अर्जावर आवश्यक ती माहिती भरून आवश्यक दस्तावेजासह त्यांचेकडील रिक्त जागांची माहिती व ना-हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव अभ्यासक्रम निहाय सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह Email द्वारे पाठविण्यात यावेत. | दि.२१/७/२०२६ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या <u>**२ दिवस अगोदर**</u> यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | संस्था बदलीने प्रवेश देणाऱ्या संस्थेचे प्राचार्य |
| २ | आ)संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विभागांतर्गत विद्यापीठ बदलासह) | सर्व शासकीय, शासन अनुदानित व विनाअनुदानित संस्थाकडून संस्था बदलाबाबत विद्यापीठा अंतर्गत प्राप्त अर्जाच्या (१-ब नुसार) अनुषंगाने सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात असणा-या संस्था बदलाचे प्रकरणी मान्यतेची कार्यवाही करावी. | दि.२२/७/२०२६ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांक यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (आंतरविभागीय ) | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे १-ब नुसार प्राप्त होणा-या विभागाच्या बाहेरील / आंतरविभागीय प्रस्तावांची दि.२४.०३.२०२५ च्या शासन अधिसूचना आणि दि.०२.०७.२०२६ च्या सुधारीत शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील तरतूदीनुसार छाननी / तपासणी करून सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह मान्यतेसाठी एकत्रित प्रस्ताव मान्यतेसाठी तंत्र शिक्षण संचालनालयास पाठविण्यात यावेत. | दि.२३/७/२०२६ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या **२ दिवस अगोदर** यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |